# श्रीराम कला महिला महाविद्यालय
## धामणगांव रेल्वे

## ★पर्यावरण अहवाल★
**सन २०१९-२०**
**बि.ए.भाग २**

# लोअर वर्धा प्रकल्प
## वरूड बगाजी सागर

◆सादरकर्ती◆

कु. ______________________

बी.ए.भाग २

श्रीराम कला महिला महाविद्यालय

◆ मार्गदर्शक ◆
डॉ.गणेश क. टाले
प्राचार्य

◆ मार्गदर्शक ◆
प्रा.अभिजीत दोड
भूगोल विभाग प्रमुख

श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगांव रेल्वे

**✻पर्यावरण विभाग✻**
**श्रीराम कला महिला महाविद्यालय,**
**धामणगांव (रेल्वे) जि.अमरावती**

Scanned by CamScanner

# ऋणनिर्देश

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत बी.ए.भाग व्दितीयच्या अभ्यासक्रमात पर्यावरण हया विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. आज पर्यावरणाच्या वेगाने होणाऱ्या अवनतीमुळे पर्यावरणीय आपत्तीची संख्या व तिव्रता वाढत चालली आहे. यावर नियंत्रण मिळवायचे असेल तर समस्यांची जाणीव समाजातील प्रत्येक घटकाला झाली पाहिजे. या उद्देशातुन हया विषयाचा अंतर्भाव अभ्यासक्रमात केलेला आहे.

श्रीराम कला महिला महाविद्यालयातील बि.ए. भाग व्दितीय च्या पर्यावरणीय अभ्यास भेटीसाठी अमरावती जिल्हयातील बगाजी सागर (लोअर वर्धा) प्रकल्पाची निवड करण्यात आली. दिनांक २८-०२-२०२० रोजी बि.ए. भाग व्दितीयच्या सर्व विद्यार्थ्यांनीनी लोअर वर्धा प्रकल्पाला भेट दिली.

या भेटीसाठी संस्थेचे अध्यक्ष मा.अरूणभाऊ अडसड, स्थानिक व्यवस्थापक समिती अध्यक्ष मा.अशोकभाऊ पनपालीया, संस्थेचे सचिव मा.घनश्यामजी मेश्राम, प्राचार्य गणेश टाले यांचे आभार मानने गरजेचे ठरते. प्रा.अभिजीत दोड व प्रा.नंदकिशोर राऊत, प्रा.बिहाडे, प्रा.आडे, प्रा.काशीकर, प्रा.पाथरे, प्रा.इंगळे, प्रा.केने यांनी या भेटीचे आयोजन केले. तसेच लोअर वर्धा प्रकल्पा वरील मुख्य अभियंता व इतर सर्व कर्मचारी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या सर्वांचे आम्ही विद्यार्थीनी मनपूर्वक आभार मानतो.

बि.ए.भाग २<br>
(भूगोल विभाग)<br>
श्रीराम कला महिला महाविद्यालय,<br>
धामणगांव (रेल्वे)

Scanned by CamScanner

# लोअर वर्धा प्रकल्प

महाराष्ट्र राज्यात भारतातील सर्वात जास्त धरणांची संख्या आहे. धरणांना आधुनिक भारतातील तिर्थक्षेत्रे म्हंटल्या जाते. यातील एक तिर्थक्षेत्र म्हणजे वर्धा नदीवरील वरूड ता.धामणगांव रेल्वे जि.अमरावती येथील वरूड बगाजी प्रकल्प होय. वर्धा नदी ही मध्य प्रदेश (जि.बैतुल) येथुन उगम पावते व पुढे ती अमरावती जिल्हयातून प्रवास करीत वैनगंगा नदीला जावून मिळते. अशा हया वर्धा नदीवर महाराष्ट्र शासनाच्या विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर व्दारे प्रकल्पाची उभारणी करण्यात आली. या करीता पंतप्रधान पॅकेज अंतर्गत विशेष अनुदान प्राप्त झाले÷

## प्रकल्पाचे स्थान

२०°५२' उत्तर अक्षवृत्त व ७८°१५' पूर्व रेखावृत्त वरूड बगाजी ता.धामणगांव रेल्वे जि.अमरावती महाराष्ट्र

## परिसरातील पर्जन्यवृष्टी

८० ते ९० से.मी.

## महाविद्यालया पासून धरणाचे अंतर

महाविद्यालया पासून धरण २५ कि.मी. वर हा प्रकल्प असून धामणगांव–आर्वी या मार्गावर आहे.

## समुद्रसपाटी पासूनची उंची

प्रस्तुत प्रकल्प हा सागरसपाटी पासून २८० मीटर उंचीवर स्थित आहे.

## धरण परिसरातील भू उठाव

वर्धा नदीच्या उजव्या व डाव्या किनाऱ्याकडील भागात भूप्रदेशाची उंची वाढत जातांना दिसते. त्यामुळे नदी मुखा कडील २.५ कि.मी. ची भिंत बांधण्यात येवून हा प्रकल्प तयार करण्यात आला आहे.



Scanned by CamScanner

**धरणाचे दरवाजे**

प्रस्तुत धरणाला एकूण ३२ दरवाजे असून ते १२ मिटर उंच व ८ मीटर रूंदीचे आहेत. त्यांना अनुक्रमे P1 to P32 असे नाव देण्यात आलेले आहे. सदर दरवाजे हे लोहपोलादापासुन बनविलेले असून त्यांचा आकार वक्राकार आहे. हे दरवाजे गरजेनूसार उघडले व बंद केले जातात.

**गॅलरी**

धरणाच्या दरवाज्यांच्या खाली एक भूयारी मार्ग काढलेला असून त्याला गॅलरी असे म्हणतात. गॅलरी मध्ये दरवाज्या मधून होणारे पाण्याचे लिकेज परत नदी मध्ये सोडल्या जाते.

**बकेट**

प्रस्तुत लोअर वर्धा नदी प्रकल्प हा बांधण्यात येण्यापूर्वी या भागात लोकवस्ती होती. ग्रामिण वस्त्या या धरणाखालील क्षेत्रात आल्या यामध्ये वरूड, येरली, चिंचखेड, धनोडी हया प्रमुख आहे. हया वस्तीचे अवशेष आपणास आजही जलसाठया मध्ये पाहता येवू शकतात. जलमग्न झालेली गावे महाराष्ट्र शासना तर्फे पुनर्वसीत केलेली आहेत.

## प्रकल्पाची फायदे

१) **जलसिंचन**

या धरणा मधून अनेक कालवे काढण्यात आलेले असून त्याव्दारे सभोवतालच्या परिसरात मोठया प्रमाणात जलसिंचन करण्यात येते.

२) **पुरनियंत्रण**

पावसाळ्यात कमी कालावधीत पडणाऱ्या प्रचंड पावसाचे पाणी धरणात साठविल्या जात असल्याने नदी काठावरील भागात पूर येण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

३) **मासेमारी**

धरणातील जलसाठया मध्ये मत्स्यबिजे सोडून त्यावर मासेमारी केली जाते.

४) **पिण्याचे पाणी**

प्रस्तुत प्रकल्पावरून धामणगांव तालुक्यातील गावांना पिण्याच्या पाण्याचा पूरवठा करण्यात येतो.



Scanned by CamScanner

## ५) पर्यटन

या प्रकल्प निर्मीतीमुळे हे स्थळ पर्यटनाचे ठिकाण बनले आहे. सुटीच्या दिवशी अमरावती, धामणगांव, यवतमाळ व विदर्भातील इतर ठिकाणाहून पर्यटक हया ठिकाणी भेटी देतात.

## ६) शेती उत्पादनात वाढ

या भागातील सिंचन क्षेत्रात वाढ झाल्याने येथील शेतकरी वर्षातून २ ते ३ पिके घेऊ लागल्याने कृषि उत्पादनात व पर्यायाने त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

## ७) कुरणांची निर्मीती

धरणाच्या आसपासच्या भागात कुरणांची मोठया प्रमाणात वाढ झाल्याने पंचक्रोशीतील गुरांना चारा उपलब्ध झाला आहे.

# प्रकल्पाचे तोटे

## १) पुनर्वसनाचे प्रश्न

धरणाच्या बुडीत क्षेत्रात गेलेल्या गावांचे अजूनही पूर्णपणे पुनर्वसन झालेले नाही. ज्या गावांचे पुनर्वसन झालेले आहे तेथेही मुलभूत सोई सुविधांचा अभाव दिसतो.

## २) धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला योग्य न मिळणे

धरणग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला योग्य त्या प्रमाणात मिळालेला नाही. शिवाय त्यांना इतर ठिकाणी ज्या जमिनी उपलब्ध करून दिल्या त्या सुपिकतेच्या बाबतीत हलक्या प्रतीच्या आहेत.

## ३) पाण्याचा प्रशन

पुनर्वसीत गावे ही नदी पासुन दुर असल्याने या गावात पाण्याची भिषण टंचाई जाणवते.

## ४) रोजगाराचा प्रश्न

धरणामुळे शेत जमिनी जलमग्न झाल्यामुळे येथील लोकांसमोर मजूरी मिळविण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

## ५) जैवविविधतेचा नाश

धरणाच्या निर्मीतीमुळे या भागातील वन्य जीवांना इतरत्र स्थलांतर करावे लागले कारण त्यांचे निवासस्थान नष्ट झाली आहेत.



Scanned by CamScanner

## ६) पर्यावरणीय ऱ्हास

धरणाच्या जलसाठयामुळे मोठ्या क्षेत्रावरील वृक्षे जलमग्न होऊन नष्ट झाली.

## ७) भूकंपाची शक्यता

मोठ्या प्रमाणातील जलसंचयनामुळे त्याचा दाब जमिनीवर पडतो त्यामुळे येथे सौम्य तिव्रतेचा भूकंप येवू शकतो.



Scanned by CamScanner

## निष्कर्ष

(१) लोअर वर्धा प्रकल्पामुळे जलसिंचन मोठ्या प्रमाणात झाले परंतु सततच्या सिंचनामुळे येथील जमिनी क्षारयुक्त होऊन नापिक बनत आहेत.

(२) प्रकल्पामुळे पुनर्वसीत गावामध्ये शासनाने विशेष लक्ष द्यायला हवे त्यांना मुलभूत सोई सुविधा पुरविण्यात याव्या.

(३) धरण परिसरातील ओसाड क्षेत्रावर वृक्षलागवड करावी.

(४) या प्रकल्पावर जलविद्युत निर्माण होण्याची संभावना आहे. येथे कमी क्षमतेचे जलविद्युत केंद्र निर्माण केल्यास कुठल्याही प्रदुषणाविना विद्युत निर्मीती होईल.

(५) प्रकल्पाला भेट देणाऱ्या अभ्यासकांसाठी निवासाची व इतर सोई सुविधाचा पुरवठा करावा.

(६) धामणगांव रेल्वे येथून पर्यटकासाठी एस.टी. बसेसची संख्या मर्यादित आहे त्यामुळे जादा प्रमाणात गाड्या उपलब्ध करून दिल्या पाहिजे.

Principal
Shriram Kala Mahila
Mahavidyalaya
DHAMANGAON Rly



Scanned by CamScanner